पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था, संचलित,

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री

## ता.फुलंब्री जि.औरंगाबाद

नॅक मुल्यांकनात 'ब' दर्जा प्राप्त

# वार्षिक अहवाल

शैक्षणिक वर्ष :- २०१७-२०१८

# संशोधन समिती

प्राचार्य

डॉ.एस.आर.टकले

समिती प्रमुख

डॉ.मंजुषा नळगीरकर

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री

## वार्षिक अहवाल २०१७-२०१८

## संशोधन समिती

संशोधन समितीच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०१७- २०१८मध्ये पुढील कार्यक्रम व बैठका घेण्यात आल्या.

**तज्ञ व्याख्यान:-**

डॉ. गणेश कुलकर्णी यांनी दि. २४ जुलै २०१७ या दिवशी संशोधनात ई-सोर्सेसचा वापर या विषयावर महाविद्यालयातील प्राध्यापकांना संगणक कक्षात प्रात्यक्षिकाद्वारे मार्गदर्शन केले.

डॉ. रमेश मंझा (संगणक विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद) यांनी दि. १९ सप्टेंबर २०१७ रोजी संशोधनात एस. पी. एस. एस. चा उपयोग या विषयावर प्राध्यापक व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.ज्यात त्यांनी एस. पी. एस. च्या माध्यमातून तथ्याचे वर्गीकरण व विश्लेषण कसे करता येते या विषयी सविस्तर माहिती दिली सदरील व्याख्यान कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान  प्राचार्य डॉ. एस. आर. टकले सर यांनी भूषविले.

**बैठक:-**

संशोधन समिती सदस्यांची दि. ३० ऑगस्ट २०१७ रोजी बैठक घेण्यात आली. सदरील बैठकीत मागील इतिवृत्तास मान्यता देण्यात आली. प्रत्येक विभागाने सर्वेक्षण करावेत. तसेच MOU साठी प्रयत्न करावेत या सूचना देण्यात आल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाला पाठविण्यात येणा-या चर्चासत्र परिषदा / कार्यशाळा या संबंधीचे डॉ. पांडुरंग कल्याणकर, डॉ. अश्विन रांजणीकर, डॉ. मंजुषा नळगीरकर यांच्या प्रस्तावास मंजूरी देण्यात आली.

संशोधन समिती सदस्यांची दि.१४ मार्च २०१८ रोजी दुसरी बैठक घेण्यात आली.सदरील बैठकीत संशोधन समितीच्या वतीने वर्षभरात घेण्यात आलेल्या कार्यक्रमाचा आढावा घेण्यात आला. समाजशास्त्र, अर्थशास्त्र व इतिहास या तीन विभागांनी  अन्य संस्थांशी सामंजस्य करार केले (MOU) आहेत. तसेच सर्वक्षण अहवाल यासंबंधीची माहिती संशोधन समितीकडे देण्याची सूचना करण्यात आली पुढील वर्षापासून संशोधन समितीने अधिक कार्यक्षमतेने काम करावे असे ठरले. या वर्षी डॉ. पांडुरंग कल्याणकर , डॉ. अश्विन रांजणीकर डॉ. दत्तात्रय येडले, प्रा. विजय पांडे यांना विद्यापीठाचे लघुसंशोधन प्रकल्प मंजूर करण्यात आले आहेत. या विषयी चर्चा झाली.

### शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये झालेले सामंजस्य करार

- समाजशास्त्र विभाग व समाजशास्त्र विभाग डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद दि २३/०९/२०१७
- इतिहास विभाग व इतिहास विभाग राजर्षीशाहू कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय पाथ्री दि ११/१०/२०१७
- अर्थशास्त्र विभाग अर्थशास्त्र विभाग डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ औरंगाबाद दि.२८/०९/२०१७

## शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठकडून मंजूर झालेले लघु संशोधन प्रकल्प

- प्रा विजय पांडे :- सामाजिक व सांस्कृतिक इतिहास आकलना संदर्भात बखर साहित्याची मौलीकता.
- डॉ. दत्तात्रय येडले :- संत साहित्य में व्यक्त पर्यावरण चेतना (हिंदी, मराठी संत साहित्य के विशेष संदर्भ में)
- डॉ. अश्विन रांजणीकर :- Mirror to Reality : A comparative study of Dalit and African American women Autobiography
- डॉ. कल्याणकर सर :-Profitability of sericulture farming : A case study of Dongargaon (Kawad)

### सामाजिक सर्वेक्षण:-

समाजशास्त्र विभागाने जानेवारी २०१८ च्या शेवटच्या आठवड्यात ग्रामीण महिलांमधील अंधश्रद्धा या विषयावर सामाजिक सर्वेक्षण केले.

### संशोधन पुरस्कार-

डॉ. पांडुरंग कल्याणकर – कर महसूलातील प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कराचे सापेक्ष महत्व-कांतीबाई ठक्कर ऋणमुक्ती प्रतिष्ठाणचे डॉ. अमर्त्यसेन पारितोषिक व सन्मानपत्र-मराठी अर्थशास्त्र परिषद, दिनांक ०५ नोव्हेंबर २०१७

डॉ. संजीवकुमार पांचाळ-भारतीय खेळांमधील शब्दावली व भाषा उच्चारणाचा चिकित्सक अभ्यास-उत्कृष्ट शोधनिबंध पुरस्कार, राष्ट्रीय परिषद “A Holistic Approach to Enhance Human Knowledge, Performance and Health Through Sports and Library Science-दिनांक-२४ फेब्रुवारी २०१७

पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था, संचलित,

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री

## ता. फुलंब्री जि. औरंगाबाद

नॅक मुल्यांकनात 'ब' दर्जा प्राप्त

## संशोधन समिती

## अतिथी व्याख्यान



**डॉ. गणेश कुलकर्णी संशोधनात ई-सोर्सेसचा वापर या विषयावर महाविद्यालयातील प्राध्यापकांना मार्गदर्शन करतांना**

.




**डॉ. रमेश मंझा संशोधनात एस. पी. एस. एस. चा उपयोग या विषयावर प्राध्यापक व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना**



उत्कृष्ट शोधनिबंध पुरस्कार स्वीकारताना डॉ. संजीवकुमार पांचाळ